# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

# दिनांक ०८/१२/२०२० (मंगळवार)

---

## अंमली पदार्थ (गांज्या) व चारचाकी वाहणासह गांज्या विक्रेत्यास अटक, ५,०२,५००/— रु. चा मुद्देमाल जप्त — स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

पोलीस ठाणे कोंढाळी :— नागपूर ग्रामीण जिल्ह्यात अंमली पदार्थ विरोधी मोहिम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने दिनांक ०७/१२/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे कोंढाळी हद्दीत गस्तीवर असता इसम नामे सुभाष सखाराम मंजुळकर, रा. वडारपुरा, कोंढाळी हा त्याचे राहते घरासमोर स्वतःचे मालकीचे महिंद्रा झायलो चारचाकी वाहण क्र. एमएच ३१/ ईए ३७९५ मध्ये अंमली पदार्थ (गांज्या) बाळगुन गिऱ्हाईकांस विक्री करीत असल्याबाबत गोपनिय सुत्रांकडुन विश्वसणीय माहिती मिळाली. सदरची बातमी वरिष्ठांना अवगत करण्यात येवुन त्यांचे आदेशान्वये सुभाष सखाराम मंजुळकर यांचे घराजवळ जावुन सापाळा कार्यवाही करण्यात आली. सदर कार्यवाही दरम्यान त्यांचे ताब्यातील महिंद्रा झायलो चारचाकी वाहण क्र. एमएच ३१/ ईए ३७९५ ची बारकाईने झडती घेतली असता डॅशबोर्डच्या डिक्कीमध्ये एका प्लास्टीक पिशवित २१६ ग्रॅम हिरव्या रंगाचा ओलसर अंमली पदार्थ (गांज्या) किंमत २,५०० रु. चा मिळून आला. सदर प्रकरणी सुभाष सखाराम मंजुळकर याचेकडुन गांज्या व चारचाकी वाहणासह ५,०२,५००/— रू. चा मुद्देमाल कायदेशिररित्या हस्तगत करुन त्यास अटक करण्यात आली. त्याचेविरूद्ध पोलीस ठाणे कोंढाळी येथे अंमली औषधीद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ चे कलम २० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्री सुजितकुमार क्षिरसागर, सहा. पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र गौरखेडे, सहा. पोलीस उपनिरीक्षक मायकल डॅनिअल, पोलीस हवालदार चंद्रशेखर घडेकर, राजेंद्र सनोडिया, निलेश बर्वे, दुर्गाप्रसाद पारडे, पोलीस शिपाई रोहन डाखोरे, अजिज दुधकनोज, चालक पोलीस नाईक अमोल कुथे यांनी यशस्वी केली.

टिप :— सदर कार्यवाहीचे छायाचित्र खालीलप्रमाणे.



CS Scanned with CamScanner

## <u>घरफोडी</u>

<u>पोलीस ठाणे मौदा</u> :— अंतर्गत दिनांक ०३/१२/२०२० चे १०.०० वा. ते १८.०० वा. दरम्यान फिर्यादी क्रिष्णा भगवान बाळबुधे, वय ५९ वर्षे, रा. चिखली, ता. कामठी हे आपले शोतात गेले असता कोणीतरी अज्ञात चोरांनी फिर्यादीच्या घराचे मागील दरवाज्याचा कोंडा तोडुन आत प्रवेश केला आणि धानाच्या कोठीत ठेवलेले ०५ ग्रॅम सोन्याची अंगठी, ०५ ग्रॅम सोन्याची बदामी अंगठी, ३८ ग्रॅम सोन्याचा कडा, २८.८०० ग्रॅम सोन्याची काळी पोत, ०२.४२०ग्रॅम सोन्याची नथ एकुण किंमत १,२०,६४९/— रु. चा ऐवज चोरुन नेला. सदर प्रकरणी पोलीस ठाणे मौदा येथे फिर्यादी यांचे तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरूद्ध कलम ४५४, ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री नितीन आगासे हे करीत असुन आरोपीचा शोध सुरू आहे.

<u>चोरी</u>

१) <u>पोलीस ठाणे रामटेक</u> :— अंतर्गत दिनांक ०७/१२/२०२० चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी अमान असलम पठाण, वय २१ वर्षे, रा. नेहरू वार्ड, भंडारा हे कांद्री माईन्स येथे डीजे वाजविण्याकरीता गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने त्यांची मोटार सायकल क्र. एमएच ३६/एई १८२१ किंमत ३०,०००/— रू. ची चोरून नेली. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे रामटेक येथे अज्ञात आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार गजानन उकेबोंद्रे हे करीत असुन आरोपीचा शोध सुरू आहे.

२) <u>पोलीस ठाणे रामटेक</u> :— अंतर्गत दिनांक ०७/१२/२०२० चे ०३.३० वा. ते ०४.०० वा. दरम्यान १) आनिश मो. हनिफ, रा. मालखेड, यवतमाळ, २) शाहरूख रजाक खान, रा. इंदिरानगर, यवतमाळ, ३) आसिफ खान मदारखान, रा. कुंभारपुरा, यवतमाळ, ४) गोलु खान, रा. कुंभारपुरा, यवतमाळ हे संगनमत करून त्यांचे ताब्यातील १) टाटा कंम्पनीचा १४ चक्का ट्रक क्र एमएच २९/ बीई २९४४ २) टाटा कंम्पनीचा १२ चक्का ट्रक क्र एमएच—२९ टी—११३२ मध्ये प्रत्येकी ०८ ब्रास एकुण १६ ब्रास रेतीची अवैधरित्या विनापरवाना चोरटी वाहतुक करतांना मिळुन आले. सदर प्रकरणी त्यांचेकडुन रेती व ट्रकसह एकुण ४०,४८,०००/— रू. चा मुद्देमाल हस्तगत करून त्यांचे विरूद्ध पोलीस ठाणे रामटेक येथे कलम ३७९, ३४ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री प्रमोद कोळेकर हे करीत आहेत.

<u>अपघातात मृत्यु</u>

१) <u>पोलीस ठाणे कुही</u> :— अंतर्गत दिनांक ०७/१२/२०२० चे १७.३० वा. दरम्यान १) सुरज सुखदेव पाटील, वय २८ वर्षे, २) ईश्वर मारोती पंधराम, वय ३५ वर्षे, दोन्ही रा. डव्वा, ता. उमरेड हे मोटार सायकल क्र. एमएच ४०/बीझेड ७५१५ ने डबलसिट सावनेर येथुन डव्वा येथे जात असता मौजा कळमना शिवारातील रिलायन्स पेट्रोल पंपजवळ अज्ञात वाहणाचे चालकाने आपले वाहण भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन त्याचे मोटार सायकलला धडक मारल्याने दोघेही गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावले. सदर प्रकरणी अज्ञात वाहण चालकाविरूद्ध पोलीस ठाणे कुही येथे कलम २७९, ३०४(अ) भादंवि सहकलम १८४, १३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती सुचिता मंडावले या करीत असुन अज्ञात वाहण चालकाचा शोध सुरू आहे.

२) <u>पोलीस ठाणे बेला</u> :— अंतर्गत दिनांक ०६/१२/२०२० रोजी ०५.४५ वा. दरम्यान फिर्यादी वैभव रोडे, वय २२ वर्षे, रा. बेला, ता. उमरेड आपले चुलत भाऊ निखिल रोडे सह मोटार सायकल क्र. एमएच ४०/बीपी ३४१५ ने बुटीबोरी येथुन बेला गावाकडे जात असतांना मौजा चिमणाझरी शिवारात डिवाईडरजवळ अज्ञात ट्रॅक्टर चालकाने आपले वाहण भरधाव वेगाने

निष्काळजीपणे चालवुन कोणत्याही प्रकारचा यु टर्नचा इशारा न देता उजवीकडे वळवुन त्यांचे मोटार सायकलला धडक मारल्याने मो. सायकल चालक निखिल रोडे गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावले. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरूद्ध पोलीस ठाणे बेला येथे कलम २७९, ३३७, ३०४(अ) भादंवि सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री ठेंगणे हे करीत असुन अज्ञात ट्रॅक्टर चालकाचा शोध सुरु आहे.

पोलीस माहिती कक्ष
जिल्हा नागपूर (ग्रामीण), नागपूर.